# Vehicle Thieves Arrested

**Four Wheeler Theft Gang -**

Four Wheeler Theft Gang Arrested by Azadnagar PS and seizued 7 four wheeler vehicles.

## व्हीआयपी वाहने चोरीचे रॅकेट उघडकीस

### सात वाहने केली जप्त;आझानगर पोलीसांची कारवाई

धुळे : राज्यातील विविध शहरांमध्ये व्हीआयपी वाहने चोरी करून त्याची दलालांमार्फत विक्री करणाऱ्यांचे रॅकेट उघडकीस आणण्यात आझादनगर पोलिसांना यश आले आहे. या टोळीतील दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून सात वाहने जप्त करण्यात आली आहेत. या कारवाईमुळे आंतरराज्यीय टोळी उघडकीस येण्याची दाट शक्यता असल्याचे पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले.



छाया : पुण्य


छाया : पुण्य

याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, पोलीस उपाधीक्षक हिंमत जाधव, पोलीस निरीक्षक रमेशसिंह परदेशी, पोलीस उपनिरीक्षक पी.सी.ढोले, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती देताना पोलीस अधीक्षक पाटील म्हणाले, विविध शहरांमधून चारचाकी वाहने चोरून त्यांची दलालांमार्फत विक्री करण्याचे काम एका टोळीतर्फे केले जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती त्या आधारे धुळे शहरातील हजार खोली भागात राहणारा जावेद खान कादीर खान हा त्याचा मालेगाव येथील साथिदार इम्तियाज अहेमत बख्तीयार अहेमद अन्सारी यासोबत असताना त्यांच्याकडे टाटा विस्टा कंपनीची गाडी (एमएच ४९, एस ४९००) सह हजारखोली भागात मिळून आला आझाद नगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रमेशसिंह परदेशी यांनी दोघांची विचारपूस केली असता दोघांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.त्यांचा संशय आल्याने त्यांना सखोल चौकशीसाठी ताब्यात घेतले व पोलीस ठाण्यात आणले.त्यांना खाक्या दाखवताच त्यांनी खरी माहिती दिली. मुंबई येथील बाबा नामक कुख्यात वाहनचोर व त्याच्या टोळीतील काहीजण महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून चारचाकी वाहने चोरी करून आणतात. चोरी करून आणलेली वाहने ते मालेगाव येथील इम्तियाज अन्सारी याच्याकडे सोपवायचे. इम्तियाज धुळ्यातील जावेदकडे ही वाहने आणून द्यायचा. जावेद व इम्तियाज हे चेचीस नंबर व नंबर प्लेट बदलण्याची कामे करायचे. यासाठी त्यांनी विशिष्ट पद्धतीचा वापर केला.

जुन्या तसेच भंगार मध्ये असलेल्या चारचाकी वाहनांच्या इंजिनचे व चेचीसचे नंबर मिळवून ते नंबर चोरून आणलेल्या वाहनांवर कोरून स्क्रेब झालेल्या वाहनांची नंबर प्लेट लावून चोरून आणलेली कारचे बनावट कागदपत्रे तयार करून ती ग्राहकांना विक्री करायचे. १५ ते २० लाखांची गाडी अवघ्या चार ते पाच लाख रुपयांना विक्री करण्याचा धंदा त्यांनी सुरू केला होता. अशा पद्धतीने त्यांनी आतापर्यंत सात व्हीआयपी कार चोरल्या आहेत. त्यात टोयोटा कंपनीची टवेरा कार (एमएच ३९, डी.६८५) ही एका जिल्हा परिषद सदस्याला विक्री केली होती. यासह स्कोडा कंपनीची कार (जीजे ६, एमएच ५१९३) होंडाई कंपनीची कार (एमएच ०७, एच २८९८), मारुती सुझुकी कंपनीची कार (एचएच ५२, के ११३२), मारुती सुझुकी कार (एचएच १७, एस ९११९) स्कोडा कंपनीची कार (एमएच १५, बीएक्स ०७२७), टाटा कंपनीची व्हीस्टा कार (एचएच ४९, एस ४९००) ही सात वाहने काढून दिली. वरील वाहने जप्त करण्यात आली असून या कार वरील चेचीस, इंजिन, नंबर प्लेट व कागदपत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याप्रकरणी जावेद खान व इम्तियाज अन्सारी या दोघांविरूद्ध आझाद नगर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४१३, ४११, ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक रमेशसिंह परदेशी, पोलीस उपनिरीक्षक ढोले यांच्यासह शोधपथकातील कर्मचारी अरुण चव्हाण, दिलीप सूर्यवंशी, मनोहर पाटील, भिकाजी पाटील, उमेश पाटील, मनोहर चव्हाण, उमेश चव्हाण, मनोज बागुल, पंकज चव्हाण, पंकज खैरमोडे, कुणाल पानपाटील, किरण साळवे, प्रेमराज पाटील, संजय बोरसे, प्रकाश मोरे आदींनी केली आहे. आंतरराज्यीय टोळी उघडकीस येण्याची दाट शक्यता पोलीस सूत्रांनी व्यक्त केली आहे.